

# यशोगाथा यळगुडची :

**शहाजीराव देशमुख,**
सातारा
९८२२२१५८८६

यळगुड हे गाव कोल्हापूरपासून दक्षिणेस ३० किलोमीटर अंतरावर महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवर आहे. या गावाची लोकसंख्या सात हजारापर्यंत असून सहकार महर्षी तात्यासाहेब मोहिते यांच्यासारख्या थोर व्यक्तीचा आदर्श व वारसा लाभलेला आहे. कानडी भाषेत योळ म्हणजे सात व गुड म्हणजे टेकडी. अशा सात टेकड्यांमध्ये वसलेल्या गावाचे नाव यळगुड पडले. या गावचे भाग्यविधाता मा. वसंतरावजी तात्यासाहेब मोहिते यांनी सन १९६० पासून ३० वर्षे सरपंच असताना त्यांच्या कारकिर्दीत यळगुड गावचा सर्वांगीण विकास केला. ते आशिया खंडातील प्रसिद्ध अशा शेतकरी सहकारी संघ, कोल्हापूर या संघात कार्यरत असताना शेतकरी संघाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांनी यळगुड गावच्या ग्रामदैवत श्री हनुमान मंदिरात दि.१४ जुलै १९६७ रोजी श्री हनुमान दूध व्यावसायिक व कृषीपूरक सेवा संस्था मर्यादित यळगुड या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत संस्थेच्या सर्वांगीण विकासाच्या कामी दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अनेक अधिकाऱ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये विशेष करुन श्री. जी. एन. मालुसरेसाहेब, श्री. बी. व्ही. मंगळवेढेकरसाहेब, श्री. शहाजीराव देशमुख व श्री. भाऊसाहेब नागटिळे यांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल.

सहकाराच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रात यळगुड हे नाव अग्रस्थानी असून श्री हनुमान दूध संस्थेचे दूधव बेकरीचे आधुनिक प्रकल्प, दोन पाणीपुरवठा संस्था, पतसंस्था, गरीब निराधार महिलांना रोजगार,उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने स्थापन केलेली श्री सुमंगल महिला औद्योगिक सहकरी संस्था, श्री हनुमान सहकारी वाहतूक संस्था, गोविंद कुक्कुटपालन संस्था, श्री हनुमान सुपर बझार, सहकार व यळगुड या ब्रँडखाली महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांमध्ये दूध, दुग्धजन्य पदार्थ व बेकरी पदार्थ विक्रीसाठी ४५० विक्रीकेंद्रे कार्यरत आहेत. अशा प्रकारे यळगुड सहकार उद्योग समूह साकारला आहे. या लोकप्रिय उद्योगसमुहाचे संस्थापक चेअरमन आदरणीय श्री. वसंतरावजी मोहितेसाहेब हे अत्यंत कुशलतेने या उद्योगाचा कारभार चालवित आहेत. त्यामुळे सहकाराच्या माध्यमातून यळगुड व परिसरात धवलक्रांती व हरितक्रांती या दोन्ही संकल्पना अतिशय यशस्वीपणे राबविल्या जात आहेत.

१५ ऑगस्ट १९६७ रोजी यळगुडचे ग्रामदैवत असलेल्या हनुमान मंदिरात संस्थेने दूध संकलनास शुभारंभ केला. संस्थेचे कामकाज सुरुवातीपासूनच अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करुन उत्पादकांना त्यांनी पुरविलेल्या दुधाचा योग्य मोबदला वेळेवर दिला. सभासदांना बँकेकडून कर्ज उपलब्ध करुन जातिवंत दुभती जनावरे पुरविली. दुभत्या जनावरांचा उपचार, कृत्रिम गर्भधारणा व देखभालीसाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक केली. दुग्ध व्यवसाय वाढीच्या दृष्टीने शासनामार्फत सुरु केलेल्या सर्व योजना व कार्यक्रम



**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWriter but I consider your product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sarras - USA

यशस्वीपणे राबवून त्याचा सर्व लाभार्थींना फायदा दिला. संस्थेने सुरुवातीस सामुदायिक दुग्धदोहन नंतर आनंद पद्धतीने म्हणजे वैयक्तिक दुधाची गुणप्रत तपासणी करुन गुणप्रतीप्रमाणे दुधास योग्य भाव दिला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मध्ये विश्वास निर्माण होऊन दुग्धव्यवसाय हा शेतीस जोडधंदा म्हणून सुरु केला व थोड्या कालावधीत संस्थेच्या कामात लक्षणीय प्रगती होऊन दूध संकलनात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ लागली व ही वाढ दैनंदिन १५,००० लिटर पर्यंत गेली. भविष्यात जादा संकलन झालेल्या दुधाच्या विल्हेवाटीचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून दुधापासून विविध दुग्धजन्य व बेकरी पदार्थ उत्पादन सुरु करण्याचा निर्णय श्री. मोहितेसाहेब यांनी दूरदृष्टीने घेतला व उत्पादित पदार्थ ग्रामीण तसेच शहरी भागातील जनतेला वाजवी दरात पुरविण्याचे नियोजन केले. दूध संकलन व वितरणाचे कामासाठी स्वत:च्या मालकीची वाहने घेऊन कार्यालयीन अधिकारी कर्मचारी यांच्या आवश्यक नेमणुका केला. संस्थेस सभागृह, संगणककक्ष, भविष्यात सुपरबझार अशा सुविधा असलेली कार्यालयीन इमारत बांधली. संस्थेच्या सभासदांना पशुखाद्य, शेतीसाठी खते, भाडोत्री अवजारे, ट्रॅक्टर, दुभत्या जनावरांसाठी सुलभ कर्जपुरवठा, पशुवैद्यकीय सुविधा, दैनंदिन जीवनामध्ये लागणारे धान्य, कपडे, भांडी, औषधे, रॉकेले-डिझेल, संसारोपयोगी आवश्यक सर्व बाबी संस्थेमार्फत पुरविण्याची व्यवस्था केली. त्यांच्या सर्व गरजा स्थानिकरित्या पूर्ण होऊ लागल्याने त्यांना बाहेर शहरात कुठेही जाण्याची आवश्यकता राहिली नाही. अशा प्रकारे संस्थेच्या प्रगतीची घोडदौड सुरु राहिली.

श्री हनुमान यळगुड संस्थेचा दिवसेंदिवस वाढत चाललेला कामाचा व्याप व संस्थेत निरनिराळे दुग्धपदार्थांचे उत्पादन सुरु करुन आधुनिक प्रकल्प उभारणीचे नियोजन करणे तसेच संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने तांत्रिक कामकाजावर नियंत्रण ठेवून भावी योजना राबविण्यासाठी संस्थेने दुग्धशाळा व्यवस्थापक वर्ग-२ दर्जाच्या तांत्रिक अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याची शासनाकडे विनंती केली. त्यानुसार शासनाने यळगुड संस्थेकडे सन १९८० पासून माझी प्रतिनियुक्तीवर व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक केली. प्रतिनियुक्तीवर हजर झाल्यावर स्वच्छ दूध उत्पादन, गुणप्रत सुधारणे, वैयक्तिक गुणप्रत तपासणी करुन दुधाचा दर देणे, दोन वेळा संकलन करुन शासनास व संघास वेळेवर दूधपुरवठा करणे, दूध संकलन, वाहतूक, हाताळणीमध्ये येणारी दुधाची तूट कमी करणे, दूध कमी प्रतीचे लागून किंवा दूध नासून होणारे नुकसान टाळणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन पुरवून प्रशिक्षण करणे, संस्थेचा सर्व तांत्रिक पत्रव्यवहार पाहणे या सर्व बाबींकडे लक्ष घालून कामकाजात लक्षणीय सुधारणा घडवून आणल्या. त्यानंतर देशी दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन सुरु करण्याच्या दृष्टीने यशस्वी चाचण्या घेऊन पेढे, बर्फी, गुलाबजाम, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड इ. दुग्धपदार्थ व मिल्कब्रेड, बिस्कीटे, खारी, टोस्ट, बनपाव, केक इ. बेकरी पदार्थांची आकर्षक पॅकिंगमध्ये कोल्हापूर शहरातील स्वत:च्या विक्रीकेंद्रातून विक्री सुरु केली. अशा प्रकारे ग्रामीण भागातील सहकारी संस्थेमार्फत उच्च प्रतीचे दुग्धजन्य व बेकरी पदार्थ तयार करुन शहरी व ग्रामीण भागातील जनतेला वाजवी दरात विकणारी



महाराष्ट्र शासनाने दूध व कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेबद्दल मा.राज्यपाल यांचे अमृत हस्ते १९८५ साली कृषि शतसंवत्सरी सुवर्ण पदक देवून गौरविलेली सहकारी संस्था

Yalgud Dairy & Bakery Products
Symbol of Hygiene & Purity
Since 1967
www.yalguddairy.com



pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files with ease!
Get yours now!
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWriter but I consider your product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sarras - USA

महाराष्ट्रातील पहिली संस्था म्हणून मान मिळाला.

संस्थेने ग्रामीण भागातील उत्कृष्ट कामकाज, संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व त्यामुळे ग्रामीण भागाचा झालेला कायापालट पाहण्यासाठी राज्यातून अनेक शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण केंद्राचे विद्यार्थी, प्राध्यापक, राजकीय सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, उद्योजक तज्ञ मंडळी अभ्यास दौऱ्यावर यळगुडला भेटी देऊ लागले. संस्थेच्या उत्कृष्ट कामकाजावर आधारित कार्यक्रम रेडिओ व दूरचित्रवाणीवर प्रसारित झाला. हा कार्यक्रम पाहून राष्ट्रीय सहकारी विकास निगम (एन.सी.डी.सी.) च्या अधिकाऱ्यांनी यळगुड संस्थेस भेट दिली. संस्था कोणतेही कर्ज न घेता स्वतःच्या भांडवलातून ग्रामीण भागात विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबवित असून संस्थेचे उत्कृष्ट कामकाज पाहून अधिकारी भारावून गेले. त्यांच्या विनंतीवरुन संस्थेचे चेअरमन श्री. मोहितेसाहेब व मी स्वतः संस्थेची दुग्धजन्य बेकरी उत्पादने घेऊन एन.सी.डी.सी. च्या संचालक मंडळाच्या मिटिंगमध्ये दिल्ली येथे उपस्थित राहिलो. यळगुडची सर्व उत्पादने त्यांना खूप आवडल्याने त्यांनी भरपूर प्रशंसा केली व संस्थेस दुध तसेच दुग्धजन्य पदार्थ व बेकरी पदार्थ प्रकल्प उभारणीस अर्थसाहाय्य देण्यास मंजुरी दिली. त्यानुसार १ कोटी २० लाख रुपये गुंतवणुक करुन दोन्ही आधुनिक प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. प्रकल्पातील दर्जेदार दूध, दुग्धपदार्थ व बेकरी पदार्थांची राज्याच्या सहा जिल्ह्यात विक्री केली जाते. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने संस्थेस दिलेले बिनव्याजी भागभांडवल संस्थेने मुदतपूर्व परत केले. तसेच एन.सी.डी.सी. दिल्लीकडून संस्थेस प्रकल्पाच्या आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी आणखी अर्थसाहाय्य मिळाले. त्याचीही परतफेड संस्थेने मुदतपूर्व करुन एक नवीन आदर्श निर्माण केला. संस्थेच्या सात शाखा कोल्हापूर जिल्ह्यात असून २७० कर्मचारीवर्ग आहे. सध्याची वार्षिक विक्री उलाढाल ३३ कोटी पर्यंत असून संस्थेचे सर्व व्यवहार रोखीने चालतात. ही उलाढाल राज्यात सर्वाधिक आहे. सन १९९२ पासून संस्थेच्या कामकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले असून आधुनिक संगणकप्रणाली अंमलात आणली आहे. प्रकल्पामध्ये उत्पादित होणाऱ्या सर्व खाद्यपदार्थांची अनुजीवशास्त्रीयदृष्ट्या गुणप्रत उच्च राखण्याच्या दृष्टीने प्रकल्प व परिसरामध्ये ठेवलेली स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, शिस्तबद्ध कामकाज, फुलझाडे व फळझाडामुळे हिरवागार सुंदर परिसर सर्वांना थक्क करुन सोडणारा आहे. संस्थेत प्रतिनियुक्तीवर काम करीत असताना सहकारातील आदर्श कामकाजातील खूप चांगल्या गोष्टी मला जवळून शिकता आल्या. त्याचा मला पुढील आयुष्यात इतर जिल्ह्यांमध्ये काम करताना चांगला उपयोग झाला. संस्थेचे सचिव श्री. के. डी. धनवडे संस्था स्थापनेपासून संस्थेचे सर्व दप्तर, हिशोब लेखे, लेखापरीक्षण व आर्थिक विषयक सर्व कामकाज बिनचूक व प्रामाणिकपणे पार पाडीत असून संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण करुन संस्थेच्या विकासामध्ये त्यांचा महत्वाचा सहभाग ठरतो. तसेच संस्थेचे तरुण तडफदार कार्यकारी संचालक श्री. सुजितसिंह मोहिते यांचे अभ्यासू व कल्पक नवीन नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर ठसा उमटवेल यात शंका नाही.

श्री हनुमान यळगुड संस्थेने गेल्या ४२ वर्षात आपल्या उत्कृष्ट कार्याच्या माध्यमातून संपूर्ण राज्य व देशपातळीवर आपल्या नावाचे वलय तयार केले असून कामकाजाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. गावाला १९८३ पासून महाराष्ट्र शासनाची कृषीपंढरी योजना लागू झाल्याने शेतकऱ्यांना चांगला लाभ झाला. संस्थेने दूध व कृषी क्षेत्रात केलेल्या भरीव कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाचे तत्कालीन राज्यपाल मा. ब्रह्मानंद रेड्डी यांच्या हस्ते संस्थेस सुवर्णपदक, कृषीभूषण पुरस्कार व रु.५००१/- रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात



**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWriter but I consider your product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sarras - USA

आला.

या संस्थेत उत्पादित मालाचा दर्जा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आणखीन सुधारुन व ग्राहकांचा चांगल्या प्रकारे सेवा देणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून डी.एन.व्ही. ऑडिटर्स, इटली यांनी संस्थेने ऑडिट यशस्वीपणे पूर्ण करुन संस्थेस ISO २२०००:२००५ फुड सेफ्टी मॅनेजमेंट सर्टिफिकेट दिले आहे. अशा प्रकारे या यळगुड सहकार उद्योग समुहामध्ये संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्प व कार्यक्रमामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावले असून स्थानिक लोकांना भरपूर रोजगार उपलब्ध झाला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील यळगुड सारख्या लहानशा खेड्यात सहकार माध्यमातून झालेला सर्वांगीण विकास राज्याला व देशाला मार्गदर्शक व सर्वांना अभिमान वाटणारा आहे

***






Dt.06/06/2010



**pdfMachine - is a pdf writer that produces quality PDF files with ease!**
**Get yours now!**
"Thank you very much! I can use Acrobat Distiller or the Acrobat PDFWriter but I consider your product a lot easier to use and much preferable to Adobe's" A.Sarras - USA